## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
## सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



### जाहीर आवाहन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक सर्वसमावेशक योजनेस अनुरूप शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एक वर्षाचा बृहत आराखडा महाराष्ट्र शासनाकडून मंजूर झाल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नवीन महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत विद्यापीठाच्या www.sus.ac.in या संकेतस्थळावरील Academic Research and Development या लिंकवर विस्तृत जाहिरात, माहितीपत्रक, शासन निर्णय, शासनमान्य वार्षिक बृहत आराखडा अपलोड करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता इच्छुक मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांनी रविवार दिनांक १५/०१/२०२३ पर्यंत विद्यापीठ कार्यालयीन वेळेत संलग्नता विभागात (विहित नमुन्यामध्ये व आवश्यक त्या कागदपत्रासह) व विहित शुल्कासह प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

रविवार या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील संलग्नता विभाग कार्यालयीन वेळेप्रमाणे सुरू राहील. पोस्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधामार्फत पाठविलेले प्रस्ताव तसेच विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क यावर कार्यवाही केली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**(योगिनी घारे)**
**कुलसचिव**

**जा.क्र.पुअहोसोविसो/संलग्नता/२०२२-२३/जाहिरात/** 211
**दिनांक :-** 9 JAN 2023

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२२,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : **vishi5.hted-mh@mah.gov.in**

---

**क्र.** संकीर्ण २०२२/ प्र क्र . ७०/वि शि ५ **दिनांक** ७ जानेवारी 2023

प्रति-

कुलकुरु/कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र.

विषय - अकृषी विद्यापीठाच्या सन 2023-24 या वर्षाच्या बृहत आराखड्याबाबत.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या, कलम, ७६ मधील तरतुदीस अनुसरुन, मा. मुख्यमंत्री महोदयाच्या अध्यक्षतेखालील, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची बैठक शुक्रवार दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी पार पडली. या बैठकीतील मान्यतेनुसार सन २०२३-२४ या वर्षाकरीता, विद्यापीठनिहाय नवीन महाविद्यालये/ नविन परिसंस्थासाठीचे मंजूर स्थळबिंदू निदर्शकाचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ (३) (क) मधील तरतुद सुधारीत करण्यात आली असून त्यानुसार सोबतच्या विवरण पत्रातील नवीन महाविद्यालये/ परिसंस्थांसाठी मंजूर स्थळबिंदूना आवश्यकतेनुसार, विद्यापीठ प्राधिकरणांची मान्यता घेण्यात यावी व त्यानुसार जाहिरात देऊन दिनांक १५ जानेवारी २०२३ पूर्वी प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

आपला
(अजित बाविस्कर)
उप सचिव. महाराष्ट्र शासन

| Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University: Category wise no. of new colleges proposed in 2023-24 | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No** | **District** | **Taluka** | **Location** | **Arts Science Commerce** | **Law** | **Night College (Arts, Science, Commerce)** | **Ladies College (Arts, Science, Commerce)** | **Fine Arts / Performing Arts** | **Fashion Design** | **Total** |
| 1 | Solapur | Akkalkot | AES Akkalkot | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | Madha | Madha | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | Sangola | Sangola | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | Solapur South | Vadala | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | Solapur North | Anandnagr Kavthe | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | Solapur South | Shankar nagar (Vinchur) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | South Solapur | Basav Nagar | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | Grand Total | | | 5 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 6 |

**Rs. १०००/-**

NAAC Accreditation २०१५
"B" Grade (CGPA २.६२)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

(नवीन महाविद्यालय (इरादापत्र व अंतिम इरादापत्र),
सुरु करण्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना)



जा. क्र. :                                        दिनांक

**परिशिष्ट - अ**

नवीन महाविद्यालयांकरीता (इरादापत्र व अंतिम इरादापत्र) मागणाऱ्या संस्थेने करावयाचा अर्ज

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता:<br>(दूरध्वनी क्रमांकासह) | |
| २. | महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता: | |
| ३. | ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालय सुरू करावयाचे आहे, त्या ठिकाणाची लोकसंख्या : | |
| ४. | नवीन महाविद्यालयासाठी इरादापत्र मागण्यात येत असलेले सत्र : | |
| ५. | अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी अस्तित्वात असल्यास त्याचा तपशील (मुळ तुकडी अनुदानावर असेल तर तसा स्पष्ट उल्लेख करावा):<br>**तुकडयांचा प्रकार नमूद करण्यात यावा. (अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाव्यित)** | (see table below) |
| ६. | आवेदन शुल्क रूपये - --------/-, धनाकर्ष क्र. ............<br>दिनांक --/--/---- बँकेचे नाव ..........................<br>(धनाकर्ष कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे नावे असावा) | |
| ७. | महाविद्यालय सुरु करावयाच्या अभ्यासक्रमाचा तपशील : | |
| ८. | संस्थेचा पंजीयनाचा क्रमांक ........... व दिनांक -----/-----/------ | |
| ९. | संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतूद असल्यास, त्या तरतूदींच्या कलम क्र. व तद्नुसार नवीन महाविद्यालय सुरू करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र. ..............व दि. ---/---/----- | |

५. (तपशील)

| | √ | विषय | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| विद्याशाखा | | | |
| अभ्यासक्रम | | | |
| विषय | | | |
| तुकडी | | | |

७. (तपशील)

| अ.क्र. | शाखा | अभ्यासक्रम | अध्यापनाचे माध्यम | अध्यापनाचे विषय |
|---|---|---|---|---|
| **१.** | | | | |
| **२.** | | | | |

<table>
<tr><td>१०.</td><td>प्रस्तावित महाविद्यालय सुरु करणार असलेले विद्याशाखा, अभ्यासक्रम व विषय हे प्रस्तावित महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकविले जात असल्यास, त्या महाविद्यालयांच्या नावासह तपशील:<br>(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळया कागदावर तपशील देण्यात यावा.)</td></tr>
<tr><td>११.</td><td>निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या :<br><table><tr><th>कला</th><th>वाणिज्य</th><th>विज्ञान</th><th>विधी</th><th>इतर</th></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>१२.</td><td>१५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागील ०३ वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी:<br><table><tr><th>अ. क्र.</th><th>शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता</th><th>वर्ष</th><th>उच्च माध्यमिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या</th><th>उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या</th><th>उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी</th></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr></table>(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळया कागदावर तपशील देण्यात यावा.)</td></tr>
<tr><td>१३.</td><td>कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरू करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी परीक्षेचे केंद्र आहे काय? : -------------</td></tr>
<tr><td>१४.</td><td>केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय संख्या : --------------------------------------------------------</td></tr>
<tr><td>१५.</td><td>अ) संस्थेव्दारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व महाविद्यालये यांचा तपशील : ---------------------------<br>ब) सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परिक्षेस बसलेले विद्यार्थी : ------------------</td></tr>
<tr><td>१६.</td><td>अ) महाविद्यालयासाठी वापरल्या जाणा-या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार : ----------------------<br>ब) सदर इमारत खोल्यांमध्ये सध्या प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? -------<br>--------------------------------- असल्यास, त्याचा तपशील : -----------------------</td></tr>
<tr><td>१७.</td><td>अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्चला असलेल्या संस्थेची आर्थिक स्थिती:-<br>अ) स्थावर मालमत्ता : ------------------------<br>ब) जंगम मालमत्ता : -------------------------<br>क) बँकेतील रोख : -------------------------<br>ड) बँकेचे वा इतर कर्ज : -------------------------</td></tr>
<tr><td>१८.</td><td>वरील उल्लेखित बाबींशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनास्मिक खर्चासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदींचा तपशील: -----------------------------------------------------</td></tr>
</table>

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष
(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)

मूळ सही (शिक्क्याची नाही)
सचिव
(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)

**परिशिष्ट - ब**

नवीन महाविद्यालयांकरीता इरादापत्र मागणाऱ्या संस्थेने करावयाचा अर्ज

**संस्थेचे नाव:-** **विद्यापीठाचे नाव:- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**ठिकाण:- सोलापूर** **विद्याशाखा:-**

| अ.क्र. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देताना विचारात घ्यावयाची तपासणी सुची | पूर्ततेचा तपशिल (होय/नाही) | जोडलेल्या कागदपत्रांचा पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणारा संस्थेचा विहीत नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत. | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील पाच वर्षाच्या अंकेक्षित आर्थिक लेखे-जोखे व लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती. या आधारे नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या विकास योजनेसाठी उपलब्ध होऊ शकणा-या आर्थिक स्त्रोतांबाबत स्वयंस्पष्ट माहिती. | | |
| ६. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र | | |
| ७. | पुढीलप्रमाणे किमान ५ वर्षे, किमान मुदत ठेवची (Fix Deposit) प्रमाणित प्रत.<br><br>अ) विधी महाविद्यालय : रु. १५.०० लाख<br><br>ब) पारंपारीक महाविद्यालय : रु ०७.०० लाख<br>(उदा. कला, विज्ञान, वाणिज्य इ.) | | |
| ८. | संबंधित राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला मुदत ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय न काढताबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| ९. | शासनाचे कायम विनाअनुदानित धोरण लक्षात घेता, मंजुर करण्यात येणा-या नवीन महाविद्यालयासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदान तत्वावरील महाविद्यालयासाठी मान्य असल्याबाबतचे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १०. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय अस्तित्वात असेल तर अस्तित्वात असलेल्या इमारतीच्या बांधकामाचा वापर वरीष्ठ महाविद्यालयासाठी केला जाणार नाही, असे हमीपत्र तसेच, कनिष्ठ महाविद्यालयाच्या बांधकामाचा प्रमाणित नकाशा सादर करावा. | | |
| ११. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणा-या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br><br>अ) मूलभुत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br><br>ब) अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध आहेत याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये मूल्यांकन / पूनर्मूल्यांकनाकरीता पात्र असल्यास नॅक / एनबीए मानंकन व मूल्यांकन, पूनर्मुल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र | | |
| १३. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेने बृहत आराखड्यामध्ये निश्चित केलेले बिंदुच्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्यासंदर्भातील कागदपत्रे.<br><br>१) **स्वत:ची जागा**<br><br>**अ)** अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br><br>**ब)** अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि. मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br><br>**क)** ड वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत .<br><br>**ड)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत.<br><br>२) **भाडयाची जागा - (किमान ०५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**<br><br>**अ)** अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्त्वार घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br><br>**ब)** अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि. मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोदणीकृत कराराची प्रत.<br><br>**क)** ड वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्त्वार घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br><br>**ड)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. | | |
| १४. | प्रस्तावित महाविद्यालयांसाठी इमारतीचा वास्तुशास्त्रज्ञाकडून तयार करुन घेतलेला नकाशा. | | |
| १५. | प्रस्तावित महाविद्यालयाकरीता भौतिक साधने निर्माण करण्यासाठी भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्त्रोत. तसेच, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणुकीसंदर्भातील तसेच त्याकरिताच्या वित्तीय तरतुदीचे नियोजन | | |
| १६. | संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील पूर्वानुभव, संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान, विविध शैक्षणिक प्रकल्पांबाबतची माहिती आणि काही ठळक विशेष संपादणूक असल्यास, त्याबाबतची सविस्तर माहिती. | | |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयाबाबतचा किमान पाच वर्ष कालावधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल. | | |
| १८. | इरादापत्र ज्या अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येणार आहे त्या अटी व शर्तींची पूर्तता निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवरीपर्यंत करण्यात येईल, असे संस्थेचे हमीपत्र. | | |

**परिशिष्ट - क**

**संस्थेचे नाव:-** | **विद्यापीठाचे नाव:- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**ठिकाण:- सोलापूर** | **विद्याशाखा:-**

| **अ.क्र.** | **नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देताना विचारात घ्यावयाची तपासणी सुची** | | | **पुर्ततेचा तपशिल (होय/नाही)** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनाने दिलेले इरादापत्र. | | | | |
| २. | नवीन महाविद्यालयाच्या अंतिम मान्यता मिळण्यासाठी संबंधित संस्थेने सादर केलेला अनुपालन अहवाल. | | | | |
| ३. | इरादापत्र विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता झाली असल्याचे संस्थेने दिलेले व विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | | | |
| ५. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत. | | | | |
| ६. | इरादापत्र देण्याकरिता जे जमिनीचे (स्वत:ची किंवा भाडेतत्वावर) निकष विहीत केलेले आहेत, ती जमीन अकृषक (संस्थेच्या नावावर किंवा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर असलेल्या) असल्यासंदर्भात कागदपत्रे. | | | | |
| ७. | अ) | इमारत (स्वत:ची) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे | | | |
| | ब) | इमारत (भाड्याची) (नोंदणीकृत भाडेकरार)<br><br>(सोबतच्या परिशिष्ट "ड" मध्ये सर्वसाधारण वर्ग खोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील सोबत जोडला आहे.) | | | |
| | **१)** | **शैक्षणिक व प्रशासकीय इमारत** | **क्षेत्रफळ** | | |
| | १.१ | प्राचार्य कक्ष | | | |
| | १.२ | कार्यालय | | | |
| | १.३ | इलेक्ट्रॉनिक्स / संगणक प्रयोगशाळा | | | |
| | १.४ | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | | | |
| | १.५ | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | | | |
| | १.६ | जिवशास्त्र प्रयोगशाळा | | | |
| | १.७ | ग्रंथालय | | | |
| | १.८ | लेडीज रुम | | | |
| | १.९ | रेकॉर्ड रूम | | | |
| | १.१० | नॅक रुम | | | |
| | १.११ | स्टाफ रुम | | | |
| | १.१२ | सभागृह | | | |
| | १.१३ | मोठे व्याख्यान कक्ष | | | |
| | १.१४ | टॉयलेट ब्लॉक | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १.१५ व्हरांडा | | |
| | १.१६ एन.सी.सी.रूम | | |
| | १.१७ एन.एन.एस.रूम | | |
| | **२.** २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती) | | |
| | २.२ वीज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | |
| | २.३ ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणा चे नकाशासह प्रमाणपत्र) | | |
| | **३.** हॉस्टेल सुविधा (परिसरात २०% विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र) | | |
| ८. | प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीत सेमिनार रुम, लेक्चरर रुम, फॅक्टरी रुम, स्टाफ रुम, प्राचार्याची रुम, कॉमन रुम, हॉस्टेल रुम इत्यादी ठिकाणी आवश्यक फर्निचर. | | |
| ९. | ७ (अ) व (ब) मधील १ व २ साठी फर्निचर (खरेदी केल्याची अधिकृत पावती) उपलब्धतेबाबत विद्यापीठाचे प्रमाणपत्र. | | |
| १०. | ग्रंथालयात पुस्तकांची सुविधा (मागणी केलेल्या विद्याशाखेशी संबंधित किमान ५०० पुस्तके खरेदी केल्याची अधिकृत पावती ) उपलब्धतेबाबत विद्यापीठाचे प्रमाणपत्र. | | |
| ११. | महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत निर्धारीत आवश्यक सामग्री (किमान रु. १.०० लाख प्रत्येक विषयासाठी राखीव) | | |
| १२. | प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना खेळण्याची सोय, कँन्टीन, हेल्थ केअर सुविधा. | | |
| १३. | संबंधित संस्था प्रस्तावित महाविद्यालयाकरिता क्रीडांगण भाड्याने वापरणार असल्यास रु. १००/- च्या स्टँम्प पेपरवर नोंदणीकृत भाडेकराराची साक्षांकित प्रत | | |
| १४. | प्रथमत: महाविद्यालय भाडेतत्त्वावरील इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्निकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे, त्याठिकाणी स्वत:च्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करणार असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| १५. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत मंजूर करण्यात येणा-या नवीन महाविद्यालयासाठी नियमानुसार वेतन व वेतनेत्तर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. १००/- च्या स्टँम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १६. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणा-या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>**अ)** मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br>**ब)** अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध आहेत<br>याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयामध्ये अर्हताधारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्तीसंदर्भात संस्थेने केलेल्या कार्यवाहीची माहिती. | | |
| १८. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये इरादापत्राच्या कालावधीत मूल्यांकन / पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र ठरली असल्यास नॅक / एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेण्यासंदर्भात कार्यवाही सुरु केली असल्याचे प्रमाणपत्र. | | |

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

परिशिष्ट -"ड"

परिशिष्ट "क" मधील अ.क्र. ७ (अ) व (ब) साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ

| अ. क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला,वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०X२५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३०X२० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २०X३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०X४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | १ | ३० X ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० X ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २० X ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २० X १५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| ९) | एन.एस.एस.रुम | १ | २० X १५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १० X १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १० X १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रूम | १ | १० X १५ | १५० | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) |
| १३) | स्टाफ रूम | १ | २० X ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४० X ३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १० X १५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |
| | एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ) | | | १०२५० | ९२०० | ९५०० | १४००० | १२८०० | १७२०० | १७५०० | २०७५० |

* व्यावसायिक महाविद्यालयासाठी स्वतंत्र शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा शिखर संस्था / केंद्रिय नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.

# प्रपत्र - "अ "

(इरादापत्र मान्यतेकरिता)

| *प्रपत्र - अ * (इरादापत्राकरिता) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नवीन महाविद्यालयांचा तपशील | विद्यापीठाने केलेली शिफारस | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे. | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नावे व महाविद्यालयांमधील अंतर | गटनिहाय विद्यार्थी संख्या (व्यावसायिक अभ्यासक्रमाची) स्वतंत्र माहिती द्यावी. | तालुक्यामध्ये महाविद्यालय शाळांमधून १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखानिहाय विद्यार्थ्यांची संख्या | मागील वर्षी किती विद्यार्थी प्रवेशा पासून वंचित राहिले | इरादापत्र देण्याकरिता शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता सदर संस्था करीत असल्याबाबतचे विद्यापीठाचे प्रमाणपत्र | नवीन महाविद्यालय सुरु करण्यास इरादापत्र द्यावे किंवा कसे याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

**अध्यक्ष,**
अधिष्ठाता मंडळ ,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

## प्रपत्र - "ब "

(अंतिम मान्यतेकरिता)

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नवीन महाविद्यालयांकरीता देण्यात आलेल्या इरादापत्राचा तपशील | इरादापत्रामध्ये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता संस्थेने केली आहे काय ? | या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या इतर अटी व शर्तीची पूर्तता संस्थेने केली आहे काय ? | नवीन महाविद्यालय सुरु करण्यास अंतिम मान्यता द्यावी किंवा कसे, याबाबतचे विद्यापीठाने स्वयंस्पष्ट अभिप्राय | विद्यापीठांनी केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

**अध्यक्ष,**
अधिष्ठाता मंडळ,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालयांना (पारंपारिक व व्यावसायिक) मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा :</u>-१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
२) शासन निर्णय क्र. एनजीसी-२००९/(३०१/०९)/मशि-४, दि.२५.९.२००९
३) शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१०/(१९३/१०)/मशि-४, दि.३०.१०.२०१०
४) शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१२/(२४७/१२)/मशि-४, दि.२.९.२०१३.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६" अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९ (१) (२) (३) नुसार नवीन महाविद्यालय मंजुरीसाठी कालबद्ध तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, या तरतुदीस अनुसरुन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित करावी, अशी तरतूद कलम १०९ (९) अन्वये करण्यात आली आहे. सदरहू तरतुदींच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय (पारंपारीक व व्यावसायिक) मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२,३ व ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय:-**

१. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

**कार्यपद्धती :- (इरादापत्राकरिता)**

१.१ विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०७ मधील तरतुदीनूसार एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ सर्व विद्यापीठांनी पाच वर्षांचा बृहत आराखडा करावा, त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानुसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढ्याच नवीन महाविद्यालयांच्या (व्यावसायिक (AICTE व NCTE मंजुरी देत असलेले व्यावसायिक अभ्यासक्रम सोडून) व पारंपारिक) प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठीचे बिंदु निश्चित केल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी बृहत आराखडयातील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे अर्ज स्वीकारु नयेत.

१.६ नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या इच्छूक संस्थांनी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०९ (३) (क) मधील तरतुदीनुसार सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अर्जाच्या नमुन्यात संबंधित विद्यापीठाकडे, ज्यावर्षी इरादापत्र मागविले असेल त्यावर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी अर्ज दाखल करावेत. त्यासोबत परिशिष्ट "ब"मध्ये नमूद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

१.७ विद्यापीठांनी ऑनलाईन (Online) पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत. अर्जात भरण्यात आलेली माहिती व त्यासोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी एक तपशीलसूची तयार करुन आवश्यक बाबींची पूर्तता करणारेच अर्ज स्वीकारावेत. ज्या विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणकप्रणाली विकसित करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांनी पुढील एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणकप्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

१.८ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरीता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार करुन, छाननी समिती त्यांचा अहवाल कुलगुरुंना सादर करेल.

१.१० ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांना सादर करण्यात येईल.

१.१३ आवश्यकता असल्यास कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. अशी तज्ज्ञ समिती गठित केल्यास ही समिती त्यांचा अहवाल अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल.

१.१४ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१५ अपात्रता कळविलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर कुलगुरु निर्णय देतील.

१.१६ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट "अ" व "ब" तसेच प्रपत्र "अ" व त्यासोबतच्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी सादर करण्यात येतील.

१.१७ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या व शासनस्तरावर छाननीअंती अंतिम पात्र ठरलेल्या प्रस्तावासंदर्भात शासनाकडून लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादापत्र देण्यात येईल.

१.१८ वरील परि. १.७ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. १.१२ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय (पारंपारिक व व्यावसायिक) यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

१.१९ विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्यात नवीन पारंपारिक / व्यावसायिक महाविद्यालये असे वर्गीकरण केलेले असेल.

२. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्याकरिता पुढील प्रमाणे निकष राहतील.

**निकष :- (इरादापत्र)**

२.१ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(२) नुसार, कलम १०७ अन्वये तयार केलेल्या सम्यक योजनेशी सुसंगत नसेल, असे उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठीचा कोणताही अर्ज विद्यापीठाकडून विचारात घेतला जाणार नाही.

२.२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(३)(ख) अनुसार आवश्यक बाबींची पूर्तता करतील आणि विहित कालावधीत प्राप्त होतील, केवळ असेच अर्ज विद्यापीठाकडून स्वीकारण्यात येतील आणि विचारात घेण्यात येतील.

२.३ ज्या संस्थांची यापूर्वीची महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करु नयेत.

**अ)** ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यांसहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार भौतिक सुविधा उपलब्ध नसतील तर,

**ब)** राज्य शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींचे तसेच, यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-“अ” व “ब” ची पूर्तता करत नसतील तर,

**क)** मूल्यांकन / पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र महाविद्यालयांच्या बाबतीत एकतर राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाकडून अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती करण्यात आली नसेल तर,

परंतु, ज्या महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन / पूनर्मूल्यांकन होऊ शकलेले नाही, अशा महाविद्यालयांची या संदर्भातील लेखी कारणे नमूद करुन त्यांचे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत.

२.४ शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदानित तत्वावर महाविद्यालय सुरु करण्यासाठी राहील.

२.५ सदर इरादापत्र हे संस्थेने नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता प्राप्त करण्यापूर्वी विहित अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या दृष्टिने दिलेले असल्याने, या इरादापत्रामुळे संस्थेस कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. त्यामुळे असे इरादापत्र देण्यात आले तरी संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय महाविद्यालय सुरु करता येणार नाही.

२.६ शासनाकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता देण्यात आलेले इरादापत्र निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत वैध असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तींच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तींची पुर्तता करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल अंतिम मान्यता मिळण्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह ३१ जानेवारीपर्यंत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

२.७ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(३)(च) अंतर्गत परंतुकामध्ये नमूद केल्याप्रमाणे खंड (ड.) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत, जर व्यवस्थापन इरादापत्रातील शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर करेल तर, इरादापत्र व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल. परंतु तसेच, अपवादात्मक प्रकरणात आणि कारणे लेखी नमुद करुन राज्य शासन, विद्यापीठाने योग्यरित्या प्रक्रिया केलेल्या व्यवस्थापनाच्या अर्जावर वेळोवेळी, इरादापत्राची वैधता एकूण १२ महिन्यापेक्षा जास्त नसेल, अशा आणखी कालावधीसाठी वाढवू शकेल. मात्र याकरिता विनिर्दिष्ट कालमर्यादा संपण्यापूर्वी संस्थेने पूर्ण समर्थनासह विद्यापीठामार्फत शासनाकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

३. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून ज्या संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्यात आलेले आहे व त्यांनी इरादापत्राच्या अटी व शर्ती पूर्ण केलेल्या आहेत, त्याप्रकरणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

**कार्यपद्धती :- (अंतिम मान्यता)**

३.१ शासनाकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरिता देण्यात आलेले इरादापत्र निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत वैध असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तींच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तींची पूर्तता करुन त्याबाबतच्या अनुपालन अहवालासह नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता मागणारा अर्ज संस्थेने आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह ३१ जानेवारीपर्यंत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

३.२ नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता मागणाऱ्या इच्छूक संस्थांनी इरादापत्रातील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचा अनुपालन अहवाल संबंधित विद्यापीठाकडे दाखल करावा. त्यासोबत परिशिष्ट “क” मध्ये नमुद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

३.३ विद्यापीठांनी ऑनलाईन (Online) पद्धतीने अनुपालन अहवाल तसेच त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रे स्वीकारावित. ज्या विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणकप्रणाली विकसित करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांनी पुढील एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणकप्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

३.४ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरिता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

३.५ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट “क” मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार तसेच, या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या निकषांनुसार करुन छाननी समिती त्यांचा अहवाल कुलगुरुंना सादर करतील.

३.६ ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

३.७ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३.८ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांना सादर करण्यात येईल.

३.९ संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ज्ञ समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-“क” मध्ये विहित करण्यात आलेल्या सुचीनुसार तसेच, इरादापत्रामधील अटी व शर्तीनुसार संबंधित संस्थेची तयारी आहे किंवा कसे, याबाबत काटेकोर परिक्षण करुन त्याचा अहवाल व्हिडिओ छायाचित्रणासह अधिष्ठता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल. विहित केलेले निकष पूर्ण न करणाऱ्या संस्थांची शिफारस विद्यापीठ करणार नाही.

३.१० वरील परि. ३.४ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. ३.९ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय (पारंपारिक व व्यावसायिक) यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

३.११ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

३.१२ अपात्रता कळविलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) कुलगुरु निर्णय देतील.

३.१३ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज व त्यासोबतचा अनुपालन अहवाल मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट “क” व प्रपत्र “ब” व त्यासोबतच्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाकडून शासनाकडे मे च्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी सादर करण्यात येतील.

३.१४ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता शासनाकडून १५ जूनपर्यंत परवानगी कळविण्यात येईल.

४ सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून ज्या संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्यात आलेले आहे व त्यांनी इरादापत्राच्या अटी व शर्ती पुर्ण केलेल्या आहेत, त्याप्रकरणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याकरिता पुढील प्रमाणे निकष राहतील.

**निकष :- (अंतिम मान्यता)**

४.१ नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता इरादापत्र दिलेल्या ज्या महाविद्यालयांनी इरादापत्रामधील अटी व शर्तीची तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता करुन अनुपालन अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे, अशा प्रस्तावांची शिफारस विद्यापीठाने शासनाकडे करावी.

४.२ विद्यापीठांनी अनुपालन अहवाल स्वीकारताना व शिफारस करताना या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी व सोबत जोडलेल्या परिशिष्ट “क” मधील निकषांची पूर्तता होत असल्याची खातरजमा करुन त्यापुष्ट्यर्थ कागदपत्रे अनुपालन अहवालासोबत क्रमवार पद्धतीने जोडण्यात यावीत.

५. परिशिष्ट “क” मधील अनुक्रमांक ७ (अ) व ७ (ब) साठी परिशिष्ट “ड” मध्ये दर्शविण्यात आलेले कक्षनिहाय आवश्यक क्षेत्रफळ विचारात घेण्यात यावे. यानुसार सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध असणे तसेच, मागणी करण्यात आलेल्या विद्याशाखानिहाय यासाठी विहित केलेल्या निकषांनुसार बांधकाम पूर्ण असणे आवश्यक राहील.

६. शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता न करणारे प्रस्ताव विद्यापीठांनी शिफारशीत करु नयेत. विद्यापीठांनी सकारात्मक शिफारस करुनही अंतिम मान्यता प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अनेक

न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. त्यामुळे निकषांची व सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारेच प्रस्ताव शिफारशीत होतील, याची दक्षता विद्यापीठाने घ्यावी. अशी पूर्तता न करणारे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी विद्यापीठाची पर्यायाने प्र.कुलगुरु तथा अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांची राहील.

७. नवीन महाविद्यालय सुरु करण्यास देण्यात येणारी मान्यता ही शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

८. ज्या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे आवश्यक आहे. संलग्निकरण किंवा इतर शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे यांची परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे जर महाविद्यालये त्या शैक्षणिक वर्षात सुरु होऊ शकले नाही तर, त्या शैक्षणिक वर्षाच्या पुढील शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे अनिवार्य राहील. अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१५१३३५३६५२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c8824 7ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2017.09.15 15:54:50 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५) सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) महासंचालक, माहिती व जन संपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
९) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी.
१०) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव.
११) सह सचिव (विशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहायक.
१३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१४) विशि-३, विशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
१५) निवड नस्ती (मशि-४).

**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७**

## * परिशिष्ट-अ *

### नवीन महाविद्यालयांकरिता इरादापत्र मागणाऱ्या संस्थेने करावयाचा अर्ज

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता :<br>(दुरध्वनी क्रमांकासह) | |
| २. | महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता : | |
| ३. | ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहे, त्या ठिकाणाची लोकसंख्या : | |
| ४. | नवीन महाविद्यालयासाठी इरादापत्र मागण्यात येत असलेले सत्र : | |
| ५. | अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी अस्तित्वात असल्यास त्याचा तपशील (मूळ तुकडी अनुदानावर असेल तर तसा स्पष्ट उल्लेख करावा) :<br>**तुकड्यांचा प्रकार नमूद करण्यात यावा. (अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित)** | (see table below) |

| | ✓ | **विषय** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|---|
| **विद्याशाखा** | | | |
| **अभ्यासक्रम** | | | |
| **विषय** | | | |
| **तुकडी** | | | |

६. आवेदन शुल्क रुपये-----/-, धनाकर्ष क्र.----------------
दिनांक ------------------ बँकेचे नाव--------------------
(धनाकर्ष कुलसचिव,-------------------------विद्यापीठ यांचे नावे असावा.)

७. महाविद्यालय सुरु करावयाच्या अभ्यासक्रमाचा तपशील:

| **अ.क्र.** | **शाखा** | **अभ्यासक्रम** | **अध्यापनाचे माध्यम** | **अध्यापनाचे विषय** |
|---|---|---|---|---|
| **१.** | | | | |
| **२.** | | | | |

८. संस्थेचा पंजीयनाचा क्रमांक -------- व दिनांक -----------

९. संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतूद असल्यास, त्या तरतुदींच्या कलम क्र. व तद्नुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र.----- व दिनांक --------

१०. प्रस्तावित महाविद्यालय सुरु करणार असलेले विद्याशाखा, अभ्यासक्रम व विषय हे प्रस्तावित महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकविले जात असल्यास, त्या महाविद्यालयांच्या नावासह तपशील :
______________________________________________
(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळ्या कागदावर तपशील देण्यात यावा.)

११. निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशेच्छूक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या :

| **कला** | **वाणिज्य** | **विज्ञान** | **विधि** | **इतर** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१२. १५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागील ०३ वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी :

| **अ. क्र.** | **शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता** | **वर्ष** | **उच्च माध्यमिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या** | **उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या** | **उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |

१३. कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी च्या परीक्षेचे केंद्र आहे काय ? ------------------------------

| | |
|---|---|
| १४. | केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय संख्या -------------------------------------------------------- |
| १५. | **अ)** संस्थेद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व महाविद्यालये यांचा तपशील------------------------<br>**ब)** सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परीक्षेस बसलेले विद्यार्थी ---------------------- |
| १६. | **अ)** महाविद्यालयासाठी वापरल्या जावयाच्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार --------------<br>**ब)** सदर इमारत खोल्यांमध्ये सध्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? --- ----------- ------- असल्यास, त्याचा तपशील ------------------------- |
| १७. | अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्चला असलेली संस्थेची आर्थिक स्थिती :-<br>**(अ)** स्थावर मालमत्ता<br>**(ब)** जंगम मालमत्ता<br>**(क)** बँकेतील रोख<br>**(ड)** बँकेचे वा इतर कर्ज |
| १८. | वरील उल्लेखित बाबींशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीचा तपशील : --------------------------------------------------- |

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**अध्यक्ष**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**सचिव**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७**

*** परिशिष्ट-ब ***

**संस्थेचे नाव :-** **विद्यापीठाचे नाव :**

**ठिकाण :-** **विद्याशाखा :-**

| **अ.क्र.** | **नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची** | **पुर्ततेचा तपशील (होय/नाही)** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणारा संस्थेचा विहित नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत. | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील पाच वर्षाच्या अंकेक्षित आर्थिक लेखे-जोखे व लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती. या आधारे नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या विकास योजनेसाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या आर्थिक स्त्रोतांबाबत स्वयंस्पष्ट माहिती. | | |
| ६. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ७. | पुढीलप्रमाणे किमान ५ वर्षे, किमान मुदत ठेवची (Fix Deposit) प्रमाणित प्रत.<br>अ) विधी महाविद्यालय : रु. १५.०० लाख<br>ब) पारंपारीक महाविद्यालय : रु. ७.०० लाख<br>(उदा. कला, विज्ञान, वाणिज्य इ.) | | |
| ८. | संबंधित राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला मुदत ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| ९. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, मंजुर करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदान तत्वावरील महाविद्यालयासाठी मान्य असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १०. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय अस्तित्वात असेल तर अस्तित्वात असलेल्या इमारतीच्या बांधकामाचा वापर वरीष्ठ महाविद्यालयासाठी केला जाणार नाही, असे हमीपत्र तसेच, कनिष्ठ महाविद्यालयाच्या बांधकामाचा प्रमाणित नकाशा सादर करावा. | | |
| ११. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>**अ)** मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br>**ब)** अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत<br>याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये मूल्यांकन/ पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र असल्यास नॅक/ एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र. | | |
| १३. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेने बृहत आराखड्यामध्ये निश्चित केलेले बिंदुच्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्यासंदर्भातील कागदपत्रे.<br>१) **स्वत:ची जागा** –<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**ड)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>२) **भाड्याची जागा – (किमान ०५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ड)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. | | |
| १४. | प्रस्तावित महाविद्यालयांसाठी इमारतीचा वास्तुशास्त्रज्ञाकडून तयार करुन घेतलेला नकाशा. | | |
| १५. | प्रस्तावित महाविद्यालयाकरिता भौतिक साधने निर्माण करण्यासाठी भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्त्रोत. तसेच, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीसंदर्भातील तसेच त्याकरिताच्या वित्तीय तरतुदीचे नियोजन | | |
| १६. | संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील पूर्वानुभव, संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान, विविध शैक्षणिक प्रकल्पांबाबतची माहिती आणि काही ठळक विशेष संपादणूक असल्यास, त्याबाबतची सविस्तर माहिती. | | |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयाबाबतचा किमान पाच वर्ष कालावधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल. | | |
| १८. | इरादापत्र ज्या अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येणार आहे त्या अटी व शर्तींची पूर्तता निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत करण्यात येईल, असे संस्थेचे हमीपत्र. | | |

**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७**

*** परिशिष्ट-क ***

**संस्थेचे नाव :-** **विद्यापीठाचे नाव :**
**ठिकाण :-** **विद्याशाखा :-**

| अ.क्र. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची | पुर्ततेचा तपशील (होय/नाही) | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनाने दिलेले इरादापत्र. | | |
| २. | नवीन महाविद्यालयाच्या अंतिम मान्यता मिळण्यासाठी संबंधित संस्थेने सादर केलेला अनुपालन अहवाल. | | |
| ३. | इरादापत्रामध्ये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता झाली असल्याचे संस्थेने दिलेले व विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत. | | |
| ६. | इरादापत्र देण्याकरिता जे जमिनीचे (स्वत:ची किंवा भाडेतत्वावर) निकष विहित केलेले आहेत, ती जमिन अकृषक (संस्थेच्या नावावर किंवा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर असलेल्या) असल्यासंदर्भातील कागदपत्रे. | | |
| ७. | अ) इमारत (स्वत:ची) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे<br>ब) इमारत (भाड्याची) (नोंदणीकृत भाडेकरार)<br>(सोबतच्या परिशिष्ट-“ड” मध्ये सर्वसाधारण वर्ग खोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील सोबत जोडला आहे.)<br>**१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत**<br>१.१) प्राचार्य कक्ष<br>१.२) कार्यालय<br>१.३) इलेक्ट्रॉनिक्स / संगणक प्रयोगशाळा<br>१.४) रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>१.५) पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा<br>१.६) जीवशास्त्र प्रयोगशाळा<br>१.७) ग्रंथालय<br>१.८) लेडीज रुम<br>१.९) रेकॉर्ड रुम<br>१.१०) नॅक रुम<br>१.११) स्टाफ रुम<br>१.१२) सभागृह<br>१.१३) मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१४) टॉयलेट ब्लॉक<br>१.१५) व्हरांडा<br>१.१६) एन.सी.सी. रुम<br>१.१७) एन.एस.एस. रुम | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **२)** २.१) पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती)<br>२.२) वीज सुविधा (वीज देयकाची प्रत)<br>२.३) ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र)<br>**३)** हॉस्टेल सुविधा (परिसरात २०% विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र) | | |
| ८. | प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीत सेमिनार रुम, लेक्चरर रुम, फॅक्टरी रुम, स्टाफ रुम, प्राचार्यांची रुम, कॉमन रुम, हॉस्टेल रुम इत्यादी ठिकाणी आवश्यक फर्निचर. | | |
| ९ | ७ (अ) व (ब) मधील १ व २ साठी फर्निचर (खरेदी केल्याची अधिकृत पावती) उपलब्धतेबाबत विद्यापीठाचे प्रमाणपत्र. | | |
| १० | ग्रंथालयात पुस्तकांची सुविधा (मागणी केलेल्या विद्याशाखेशी संबंधित किमान ५०० पुस्तके खरेदी केल्याची अधिकृत पावती) उपलब्धतेबाबत विद्यापीठाचे प्रमाणपत्र. | | |
| ११ | महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत निर्धारित आवश्यक सामग्री (किमान रु.१.०० लाख प्रत्येक विषयासाठी राखीव) | | |
| १२ | प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना खेळण्याची सोय, कॅन्टीन, हेल्थ केअर सुविधा. | | |
| १३ | संबंधित संस्था प्रस्तावित महाविद्यालयाकरिता क्रीडांगण भाड्याने वापरणार असल्यास रु.१००/- च्या स्टॅंप पेपरवर नोंदणीकृत भाडेकराराची साक्षांकित प्रत. | | |
| १४ | प्रथमत: महाविद्यालय भाडेतत्वावरील इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्निकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे, त्याठिकाणी स्वत:च्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करणार असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| १५ | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत मंजूर करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयासाठी नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅंप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १६ | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>**अ)** मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br>**ब)** अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत<br>याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |
| १७ | प्रस्तावित महाविद्यालयामध्ये अर्हताधारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीसंदर्भात संस्थेने केलेल्या कार्यवाहीची माहिती | | |
| १८ | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये इरादापत्राच्या कालावधीत मूल्यांकन/पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र ठरली असल्यास नॅक / एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेण्यासंदर्भात कार्यवाही सुरु केली असल्याचे प्रमाणपत्र. | | |

**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७**

**परिशिष्ट -"ड"**

**परिशिष्ट "क" मधील अ.क्र. ७ (अ) व (ब) साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ**

| अ. क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला,वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०X२५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३०X२० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २०X३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०X४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | १ | ३० X ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० X ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २० X ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २० X १५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| ९) | एन.एस.एस.रुम | १ | २० X १५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १० X १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १० X १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रूम | १ | १० X १५ | १५० | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) |
| १३) | स्टाफ रूम | १ | २० X ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४० X ३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १० X १५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |
| | **एकूण** (किमान आवश्यक क्षेत्रफळ) | | | **१०२५०** | **९२००** | **९५००** | **१४०००** | **१२८००** | **१७२००** | **१७५००** | **२०७५०** |

* व्यावसायिक महाविद्यालयासाठी स्वतंत्र शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा शिखर संस्था / केंद्रिय नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

| * प्रपत्र-अ * (इरादापत्राकरिता) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नवीन महाविद्यालयांचा तपशील | विद्यापीठाने केलेली शिफारस | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे. | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नावे व महाविद्यालयांमधील अंतर | गटनिहाय विद्यार्थी संख्या (व्यावसायिक अभ्यासक्रमाची स्वतंत्र माहिती द्यावी | तालुक्यामध्ये महाविद्यालय शाळांमधून १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखा निहाय विद्यार्थ्यांची संख्या | मागील वर्षी किती विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले | इरादापत्र देण्याकरिता शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता सदर संस्था करीत असल्याबाबतचे विद्यापीठाचे प्रमाणपत्र | नवीन महाविद्यालय सुरु करण्यास इरादापत्र द्यावे किंवा कसे याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

मूळ सही (शिक्क्याची नाही)

अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ (संबंधित अकृषि विद्यापीठ)

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

| * प्रपत्र-ब * (अंतिम मान्यतेकरिता) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नवीन महाविद्यालयांकरीता देण्यात आलेल्या इरादापत्राचा तपशील | इरादापत्रामध्ये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता संस्थेने केली आहे काय ? | या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या इतर अटी व शर्तींची पूर्तता संस्थेने केली आहे काय ? | नवीन महाविद्यालय सुरु करण्यास अंतिम मान्यता द्यावी किंवा कसे, याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय | विद्यापीठांनी केलेली शिफारस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ (संबंधित अकृषि विद्यापीठ)